# देशाचे रखवालदार

सोली पावरी
पेरिन आद्रीआनवाला



'उद्याचे नागरिक' पुस्तकमाला

*सल्लागार*

ग. बा. नेवाळकर

सु. श्री. अय्यर • र. सा. गायतोंडे
ह. ई. झाला • चिं. श्री. कर्वे
बाळ सामंत • सौ. स. मो. सिरसाट

*संपादक*

सोली पावरी ○ रसिक शाह

*कला संचालक*

सुरेंद्र सिरसाट

---


'उद्याचे नागरिक' पुस्तकमाला क्रमांक–८

देशाचे रखवालदार

*सोली पावरी व पेरिन आद्रीआनवाला लिखित*

They Protect the Nation

या मूळ इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद


© (१९६८) सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि. मुंबई.


मुद्रक : स. ना. तवकर, सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लि., (मुद्रणालय), वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुंबई, ३१.

प्रकाशक : कृ. रा. सामंत, सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लिमिटेड, मुंबई–१४.

. 5.00

सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लिमिटेड

१७२ नायगाव क्रॉस रस्ता, मुंबई १४.

# अंक पहिला
# अंतर्गत आघाडी



(डॉ. मराठे अजून आपल्या दवाखान्यातून परतले नाहीत. मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, संध्याकाळी त्यांना खेळात किंवा इतर गोष्टीत गुंतवून ठेवणे या गोष्टी बहुधा सौ. मराठेबाईंनाच बघाव्या लागतात. त्यांना सुरेशवर विशेष लक्ष ठेवावे लागते. कारण तो जरा खोडकर आहे आणि नेहमी आपल्या दोन लहान भावांशी भांडण उकरून काढतो.)

वेळ : संध्याकाळी साडेसहा. सौ. मराठेबाईंना दोघा भावांचे भांडण ऐकू येते.

सुरेश : (तक्रारीच्या सुरात) आई! या रमेशला सांग, आमच्या वाटेला जाऊ नको म्हणून. तो आणि किरण आम्हांला सारखे त्रास देतात. अशाने एखादे वेळी आमचा चेंडू त्यांना लागेल. मग आम्हांला काही विचारू नकोस!

सौ. मराठे : रमेश, कसला खेळ खेळत आहात तुम्ही? त्यांना कशाला त्रास देता?

रमेश : आई, किरण किनई सायकल चालवीत होता आणि मी झालो होतो पोलीस. हे जिथं खेळत होते तिथंच नेमकी त्याची सायकल थांबली. कारण त्याच वेळी





गृह संरक्षक दलाचे
आग विझविण्याचे प्रात्यक्षिक

मी त्याला 'थांबा' असा सिग्नल दिला होता. या सुरेशनं ताबडतोब सायकलची मोडतोड करून टाकली. आता आम्ही खेळणार तरी कसे ?

( डॉ. मराठे यांचे मित्र श्री. साळवी येतात. )

रमेश : कोण आलं पाहिलं का ? साळवीकाका आले आहेत. नमस्ते साळवी काका !

साळवीकाका : नमस्ते वहिनी आणि छोटे लोक ! मी जरा घाईत आहे, बरं का. मला ठरल्याप्रमाणे संध्याकाळी येता येणार नाही एवढंच मराठ्यांना सांगायला आलो आहे.

रमेश : पण बाबा घरात नाहीत. आणि काका, तुम्ही एवढे घाईत कसे ? आज संध्याकाळी तुम्हांला कामावर जायचं नव्हतं, होय ना ? मग आता तुम्ही गणवेष घालून कुठे निघालात ?

काका : आणीबाणीच्या कामासाठी मला बोलावलं आहे. शहराच्या [illegible] भागात एका रंगाच्या गुदामाला मोठी आग लागली आहे. तिकडेच चाललो आहे मी. बरंय, निघतो मी. नमस्ते वहिनी ! छोटे लोक, टा ऽ टा.

मुले : टा ऽ ऽ टा !

(साळवीकाका घाईने जातात. दुसऱ्या दिवशी सकाळी साळवीकाका येतात. रमेश, महेश आणि सुरेश ही भावंडे साळवीकाकांना आदल्या दिवशीच्या आगीसंबंधी प्रश्न विचारून भंडावून सोडतात.)

रमेश : काका, काल रात्री तुम्ही घरी केव्हा गेलात?


काका : रात्री कसला घरी जातोय! अरे आज पहाटे तीन वाजेपर्यंत आम्ही तिथं होतो. रंगाच्या गुदामाला आग लागलेली आणि रंग तर लवकर पेट घेतात. मग काय विचारता! हा हा म्हणता आग पसरली. शेजारची चाळसुद्धा आगीच्या तडाख्यात सापडली. त्या चाळीच्या लाकडी जिन्याने प्रथम पेट घेतल्यामुळे सर्वात वरच्या मजल्यावरचे लोक वरतीच अडकून राहिले.

रमेश : पण काका, अशा प्रसंगी पोलीसांचं काय काम? आग विझवायचं काम तर अग्निशामक दलाचं आहे, नाही का?

काका : आम्ही अग्निशामक दलाला मदत करायला गेलो होतो. प्रथम आम्ही बघ्यांची गर्दी थोपवून धरली. आमच्याशिवाय तिथं गृहसंरक्षक दल (होमगार्डस्) आणि रुग्णवाहक दलही (ॲम्ब्युलन्स) होतं. पोलीसांना अशा वेळी या दलां-खेरीज आपल्या गुन्हेगार-शोधक विभागाचीही मदत घ्यावी लागते.

सुरेश : गुन्हेगार-शोधक विभाग? त्याचा इथं काय संबंध?


काका : साधारणपणे त्या विभागाचा आगीशी संबंध येत नाही. पण कालचीच गोष्ट पाहा ना. काही वेळाने आम्हांला समजलं की, ती आग अपघाताने लागली नव्हती तर आपण केलेली चोरी उघडकीला येऊ नये म्हणून कोणीतरी मुद्दाम



आग लावली होती. केवढा भयंकर दुष्टपणा ! त्या चाळीतील वरच्या मजल्या-वरील लोकांना वाचविता आलं नसतं तर....? त्या मजल्यावरचे कितीतरी लोक भाजून जखमी झाले. त्यांना ताबडतोब इस्पितळात हलवावं लागलं.

सुरेश : आमच्या रस्त्यावरचं एक जुनं घर तीन वर्षांपूर्वी कोसळून पडलं. त्यावेळी किती-तरी लोकांना ढिगाऱ्याखालून ओढून काढलं आणि ताबडतोब इस्पितळात हलवलं. त्यावेळी सहा अग्निशामक दलं आणि तेरा रुग्णवाहिका आल्या होत्या. तरी रुग्ण वाहिकांना इस्पितळाच्या अनेक फेऱ्या कराव्या लागल्या.

काका : हो. साधारणपणे, अशा संकटाच्या वेळी ताबडतोब अग्नि शामक दल व नगर-पालिकेचे रुग्णवाहक दल यांना एकाच वेळी बोलावतात. याशिवाय, काही खाजगी रुग्णवाहक दलांनाही संदेश देतात. म्हणजे ही सर्व दलं शक्य तितक्या लवकर घटनास्थळी येऊन शक्य ती मदत ताबडतोब करू शकतात.



रमेश : पण, एका रुग्णवाहिकेबरोबर एवढे लोक कशाला लागतात ? जखमी माणसाला स्ट्रेचरवर ठेवायचं आणि स्ट्रेचर रुग्णवाहि-केत न्यायचं—एवढं साधं तर काम असतं हे ! असं काम तर तिथं जमलेल्यांपैकी कोणीही स्वयंस्फूर्तीनं करील.

काका : तितकं सोपं नाही ते ! स्ट्रेचर रुग्णवाहिकेत नेताना जखमी माणसाला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. गरज वाटल्यास, तिथल्या तिथे

प्रथमोपचारही करावा लागतो. स्ट्रेचर वाहून नेणाऱ्या सर्व सेवकांना प्रथमोपचाराचं प्रशिक्षण घ्यावं लागतं. त्यांना जखमी माणसाशी प्रेमाने आणि सहानुभूतीपूर्वक वागावं लागतं. त्याला धीर द्यावा लागतो. शिवाय हे सेवक शूर आणि कर्तव्यदक्ष असावे लागतात. ते कित्येकदा आग लागलेल्या किंवा कोसळलेल्या घरात शिरतात. त्यांना भयंकर धोक्यातून जावं लागतं. मोठा स्वार्थत्याग करावा लागतो. अशा प्रकारची कामगिरी पार पाडताना हातपाय, डोळे, एवढंच नव्हे तर, कधीकधी जीवही गमावल्याची उदाहरणं आहेत.

महेश : मला अग्निशामक दलाची माणसं आवडतात. आगीच्या बंबावर असताना ते कसे तरतरीत आणि रुबाबदार दिसतात. आगीचा बंब जात असला की, मी नेहमी त्यांना बघायला धावतो.

काका : पण तो रुबाबदार पोषाख घालण्यापूर्वी त्यांना कठीण प्रशिक्षण घ्यावं लागतं. शिस्त आणि तरतरीतपणा हा त्यांच्या स्वभावाचाच भाग बनतो. नुसत्या प्रशिक्षणाने भागत नाही. अग्निशामक केंद्रावर त्यांच्याकडून सतत प्रात्यक्षिके करून घेऊन त्यांना नेहमी सज्ज ठेवले जाते. नागपूरला राष्ट्रीय अग्निशमनशास्त्र महाविद्यालय (नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज) आहे. शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर तुला त्या महाविद्यालयात प्रवेश मिळविता येईल.

महेश : तिथला अभ्यासक्रम किती वर्षांचा आहे ?

काका : वर्षं कुठली ? सहायक अधिकारी (सबऑफिसर) होण्यासाठी पंचवीस आठवड्यांचा अभ्यासक्रम आहे. अर्थात शारीरिक सुदृढता आणि योग्यता याबाबत तिथं फार कटाक्ष असतो. नंतर तीन-चार वर्षं प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतल्यानंतर केंद्र अधिकारी



(स्टेशन ऑफिसर) होण्यासाठी त्या पदाचे प्रशिक्षण घ्यायला पुन्हा महाविद्यालयात जाता येतं. पुन्हा थोड्या अनुभवानंतर तुम्हांला विभागीय अधिकाऱ्याच्या (डिव्हिजनल ऑफिसर) प्रशिक्षणासाठी पाठविलं जातं. यातील प्रत्येक अभ्यासक्रम फार थोड्या कालावधीचा—२२ ते २५ आठवड्यांचा—असतो. सर्वात उच्च डिप्लोमा म्हणजे "सहकारी सभासद—राष्ट्रीय अग्निशमनशास्त्र महाविद्यालय" हा असतो.

रमेश : छे, छे! विभागीय अधिकारी होण्यासाठी इतकी वर्षं वाट पहायची? आपल्याला नाही बुवा जमणार! त्यापेक्षा मला पोलीस दलात जायला आवडेल.



सुरेश : पोलीस? हल्ली रस्त्यावरती विजेचे सिग्नल रहदारीचं नियंत्रण करतात. आता पोलीसांची गरजच उरलेली नाही. आणि इंग्लंडमधल्या स्कॉटलंड यार्डप्रमाणेच आपले पोलीससुद्धा आता गुन्हेगारांना शोधण्यासाठी यंत्रमानवाचा उपयोग करू लागतील असं म्हणतात. मग पोलीस हवेतच कशाला? खरं ना काका?

काका : मुळीच नाही. पोलीस दल आणि त्याची कामं याविषयी तुमच्या कल्पना फारच अपुऱ्या माहितीवर आधारलेल्या आहेत.

पोलीस दलात कितीतरी शाखा असतात. पोलीसांच्या ज्या कामाचा तू उल्लेख केलास ते काम मुख्यत: पोलीसदलातील कॉन्स्टेबल, उपनिरीक्षक (सब-इन्स्पेक्टर) यांसारख्या खालच्या श्रेणीचे लोक करतात. अरे, कॉन्स्टेबल होण्यासाठी शालान्त परीक्षा उत्तीर्ण व्हायचीही गरज नाही. तू महाविद्यालयातील दुसऱ्या वर्षाची (इंटरमिजीएट) परीक्षा उत्तीर्ण झालास की ताबडतोब उपनिरीक्षक (सब-इन्स्पेक्टर) या पदाच्या प्रशिक्षणासाठी पात्र ठरशील. अर्थात इतर काही महत्त्वाच्या गोष्टी असतातच.

सुरेश : त्या कोणत्या ?

काका : सुदृढ शरीर असावं लागतं. खेळामध्ये प्राविण्य मिळविलेलं असलं तर फारच चांगलं. आणि उमेदवार भारताचा नागरिक असावा लागतो.


रमेश : काका, तुम्ही कॉन्स्टेबल म्हणून पोलीस दलात प्रवेश केलात की, उपनिरीक्षक (सब-इन्स्पेक्टर) म्हणून ?

काका : कॉन्स्टेबल नाही आणि उपनिरीक्षकही (सब-इन्स्पेक्टरही) नाही. पोलीस-दलात प्रवेश मिळविण्यापूर्वी मी पदवी संपादन केलेली असल्यामुळे मला पोलीस प्रशिक्षण शाळेत एक वर्षाकरिता पाठविलं. तेव्हापासून मला अनेक परीक्षा द्याव्या लागल्या आणि एकामागोमाग एक वरच्या जागाही मिळत गेल्या.

रमेश : पोलीस प्रशिक्षण शाळेतील तुमचं प्रशिक्षण संपल्यानंतर तुम्ही काय केलंत ?

काका : त्यानंतर मी निरीक्षक (इन्स्पेक्टर) म्हणून काम केलं. पोलीसदलात उपनिरी-क्षकाचा (सब इन्स्पेक्टर) निरीक्षक (इन्स्पेक्टर) होतो; नंतर सहायक पोलीस

भारतीय पोलीसदलाच्या श्रेणी



अधीक्षकाचा ( असिस्टंट सुपरिंटेंडंट ऑफ् पोलीस ) पोलीस अधीक्षक ( सुपरिंटेंडेंट ऑफ् पोलीस ) आणि अखेरीस पोलीस उप महानिरीक्षकाचा ( डेप्यूटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलीस ) पोलीस महानिरीक्षक ( इन्स्पेक्टर जनरल ऑफ् पोलीस ) होतो. अशा प्रकारे एखादी व्यक्ती पोलीस महानिरीक्षक या सर्वांत उच्च पदापर्यंत जाऊ शकते. आता माझा मित्र म्हात्रे याचं उदाहरण घ्या. तोसुद्धा पोलीस दलात उपनिरीक्षक (सब–इन्स्पेक्टर) म्हणून आला नाही. बी. ए. झाल्यावर त्याने कायद्याची पदवी घेतली आणि वकीलीची सनद घेऊन तो फौजदारी खटले चालवू लागला. काही दिवसांनी त्याची एकदम पोलीस वकील (पोलीस प्रॉसिक्युटर) या पदावर नेमणूक आली. आता तो पोलीस दलाच्या वतीने सर्व खटले चालवितो. मी आणि म्हात्रे आता पोलीस दलात रुळलो आहोत. आमच्या दलाचं काम आम्हा दोघांनाही आवडतं.

सुरेश : तुमचं म्हणणं खरं असेलसुद्धा. पण मला तर असं वाटतं की तुमच्या पोलीस दलात दिखाऊपणाच जास्त असतो. पोलीस रुबाबदार गणवेष घालून बँडच्या तालावर मोरे ऐटीत संचलन करतात. पण कुठे दंगे-धोपे झाले, तंग परिस्थिती निर्माण झाली आणि खरी कामाची वेळ आली की, त्यावेळी मात्र पोलीसांना परिस्थिती आटोक्यात आणता येतेच असं नाही.

काका : मुळीच नाही. आमच्या कामाची तुला कदर नाही. तुला कदाचित कल्पना नसेल – कित्येक वेळा फार तंग परिस्थिती निर्माण झाल्यामुळे पोलीस दलातील



लोकांना लागोपाठ अनेक दिवस सतत चोवीस तास कामावर हजर रहावं लागलं आहे. अशा वेळी त्यांना जेवायलाही जाऊ देत नाहीत! आज सकाळीच मी भारत सरकारच्या राजपत्राच्या (गॅझेट) काही प्रती चाळत होतो. त्यांत सेवानिष्ठेबद्दल पोलीसांना दिलेल्या पदकांचा उल्लेख आणि त्यांच्या कामगिरीचा गौरव मला आढळला. त्यांतली एक-दोन उदाहरणे मला अजून आठवतात. तुला आठवतं का—१९६१ मध्ये पुण्याचं पानशेत धरण फुटलं. त्या भयंकर आपत्तीच्या वेळी पोलीस आणि इतर रक्षक दलांनी संकटग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी शर्थ केली. घरत नावाच्या एका सब्-इन्स्पेक्टरने आपला जीव धोक्यात घालून पाण्याच्या घोंघावत्या प्रवाहात उडी मारली व एका स्त्रीचे प्राण वाचविले. या त्याच्या असामान्य धैर्याबद्दल त्याला पदक दिलं. दुसऱ्या एका पोलीसाची गोष्ट तर याहून अधिक थक्क करणारी आहे. पळून जाणाऱ्या एका गुन्हेगाराला पकडण्यासाठी त्याने धावत्या गाडीतून उडी मारली आणि आपले प्राण गमावले! हे तर काहीच नाही. आमच्या पोलीस दलात हत्यारबंद किंवा सशस्त्र पथकही असतं. तुला गोवा-मुक्ती कारवाई आठवते का? आपल्या रस्त्यावर ठिकठिकाणी सुरुंग पेरले आहेत हे माहीत असताना आणि अशाच एका सुरुंगामुळे आपल्या डोळ्यासमोर आपल्या पुढच्या वाहनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या दिसत असताना आगेकूच करायला फार मोठं धैर्य लागतं. असाच एक भरपूर सुरुंग पेरलेला रस्ता आपल्या सैन्याला पार करायचा होता. सुरुंग नेमके कोठे पेरले आहेत आणि कोणता भाग वाहनांना जायला सुरक्षित आहे हे कळणं आवश्यक होतं. समोरून शत्रूच्या संगिनींचा भडिमार चालला होता. अशा परिस्थितीत राज्य राखीव पोलीस दलाचा एक निधड्या छातीचा कॉन्स्टेबल ड्रायव्हर आगेकूच करीत निघाला आणि त्याच्या मागून जाणाऱ्या आपल्या सैन्याचा मार्ग त्याने सुरक्षित करून दिला! मात्र पोलीस दल इतकं कार्यक्षम असूनही ते वाढविता येत नाही. कारण फक्त आणीबाणीच्या प्रसंगी मनुष्यबळाची उणीव जाणवते आणि त्यावेळी गृहसंरक्षक दलाची किंवा फारच

गरज भासली तर सैन्याची मदत घेता येते. ' गृह संरक्षक दल ' ( होमगार्डस् ) या नावावरून देशाच्या सुरक्षिततेची आतील आघाडी सांभाळण्याचं काम या दलाकडे असेल हे स्पष्ट होतं, नाही का ?

सुरेश : पण, पोलीस दलाचंही हेच काम असतं. मग गृहसंरक्षक दल पोलीस दलात विलीन का करत नाहीत ?

काका : कारण एवढं मोठं पोलीस दल राखणं आणि त्याला प्रशिक्षण देणं फार महाग पडेल! खर्चाचं होईल! परवडणार नाही. पोलीस दलासाठी सध्या उपलब्ध असलेल्या सुखसोयीही अपुऱ्या पडतील. गृहसंरक्षक दलात सामान्य जनतेतूनच भरती केली जाते. या लोकांना प्रथमोपचार, गृहपरिचर्या ( होमनर्सिंग ), अग्निशमन, आपदग्रस्त-साहाय्य ( रेस्क्यू ), रुग्णवहन, बिनतारी तारायंत्र चालविणे, इत्यादी गोष्टींचं प्रशिक्षण दिलं जातं. पोलीस दलातील माणसाला हे प्रशिक्षण पुरेसं नाही. पण आणीबाणीच्या वेळी काहीही माहीत नसलेल्या सामान्य माणसांपेक्षा एवढं प्रशिक्षण मिळालेल्या गृहसंरक्षक दलाची जास्त मदत होते. दुसऱ्या शब्दात सांगायचं म्हणजे सैन्य आणि प्रादेशिक सेना यांचं जे नातं तेच पोलीस दल आणि गृहसंरक्षक यांचं नातं.

रमेश : बिनतारी तारायंत्र चालविणाऱ्या त्या मोटारीतून तुम्हीही फिरता काहो, काका ?

काका : नाही. कारण, बिनतारी तारायंत्राच्या जाळ्याचं नियमन करणारी एक वेगळी शाखा असते आणि त्यांचे निराळे उप-निरीक्षक आणि पोलीस उप-अधीक्षक असतात. बिनतारी तारायंत्र हाताळण्यासाठी त्यांना खास प्रशिक्षण दिलेलं असतं. या दलात प्रवेश

बिनतारी तारायंत्र असलेली गाडी



मिळण्यासाठी खास वेगळी पात्रता ठरवून दिलेली असते. याशिवाय पोलीस मोटार वाहतूक व्यवस्था असते, त्यांचा वेगळा कर्मचारी वर्ग असतो. आमच्या पोलीस दलात जलवाहतूक शाखाही असते. या सर्व शाखांना तंत्रज्ञ, ड्रायव्हर, सफाई-कामगार, क्लीनर, वाहनांची देखभाल करणारे लोक या सर्वांची गरज असते.

रमेश : काका, एकदा आमच्याकडे चोरी झाली त्यावेळी आम्ही तुम्हांला मदतीसाठी बोलावलं. तुम्ही एका माणसाला आणलं. त्या माणसानं आमच्या कपाटाच्या दारावर आणि इतर वस्तूंवर पावडर पसरली आणि त्यांची छायाचित्रे घेतली. कोण होता तो?

काका : तो गुन्हेशोधक विभागाचा (सी. आय. डी.—क्रिमिनल इन्व्हेस्टिगेशन डिपार्टमेंट) ठसेतज्ञ होता. आपल्या विभागाला गुन्हेगार शोधण्याला मदत व्हावी म्हणून त्याने ती छायाचित्रे घेतली. दोन गवताची पाती ज्याप्रमाणे कधीही एकसारखी नसतात त्याप्रमाणेच कोणत्याही दोन व्यक्तींच्या हाताचे अगर पायाचे ठसे सारखे नसतात. गुन्हेगार शोधताना पोलीस याच गोष्टीचा उपयोग करतात. कित्येकदा पायांच्या ठशांची, कागदपत्रांची आणि कधीकधी तर गुन्हा जिथं घडला त्या संपूर्ण खोलीची छायाचित्रं त्यांना घ्यावी लागतात. या तज्ञांना या कामाचं खास प्रशिक्षण दिलेलं असतं.

सौ. मराठे : पोरांनो, तुमच्या प्रश्नांची सरबत्ती आता पुरे करा! काकांना जरा स्वस्थ बसू द्या पाहू.



# अंक दुसरा
## सरहद्दीवर






(डॉ. मराठे यांनी आपला जुना शाळा-सोबती शामराव शिंत्रे आणि त्यांच्या पत्नी सुशिलाबाई यांना आज रात्री जेवायला बोलावले आहे. रमेश, सुरेश आणि हरीश या मुलांना शामकाका फार आवडतात. ते भारतीय सैन्याच्या हवाई दलात अधिकारी असून सध्या रजेवर आहेत.

मुलांना भेट म्हणून पाहुण्यांनी भारत पाकिस्तान युद्धाचा चित्रसंग्रह आणला आहे. ते सर्वजण मोठ्या कौतुकाने पॅटन रणगाडे, जेट विमाने, बॉंबफेक केलेले प्रदेश यांची चित्रे आणि गणवेष घातलेल्या आणि निर-





निराळी सन्मानपदके धारण करणाऱ्या व्यक्तींची छायाचित्रे पाहात आहेत.)


शामकाका : प्राणांची पर्वा न करता ज्यांनी आपल्या मातृभूमीची शान राखली त्या या भारतमातेच्या सुपुत्रांची छायाचित्रे आपण पाहू या. यांच्यापैकी काही वीर तर खरोखर प्राणास मुकले. यांच्यापैकी प्रत्येकाने रणांगणावर अद्वितीय शौर्य गाजविलं आहे. त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल आता त्यांचा मायदेश पारितोषिकांनी आणि पदकांनी त्यांचा सन्मान करीत आहे.

हरीश : हा, हे पाहा त्यांच्या नावाखाली 'वीरचक्र' आणि 'महावीर चक्र' असं लिहिलं आहे. अरे वा, या दोघांच्या नावाखाली तर लाल अक्षरात 'परमवीर चक्र' असं लिहिलंय.

शामकाका : रणांगणावर अत्युच्च प्रकारचा पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकास 'परमवीर चक्र' बहाल केलं जातं. 'परमवीर चक्र' विजेत्याचं नाव वाचलंस का?

सुरेश : हो. हवालदार अब्दुल हमीद. त्याने एकामागोमाग एक पाकिस्तानचे पॅटन रणगाडे वाळूच्या ढिगांसारखे उडवून लावले. पण शेवटी शत्रूच्या एका तोफ-गोळ्याने त्याचा बळी घेतला होय ना?

शामकाका : हो. हा वीर सैन्यातला कोणी मोठा अधिकारीही नव्हता. तो होता साधा कंपनी क्वार्टर मास्टर हवालदार. म्हणजे सैन्यातले एक खालचे साधे पद. ही पदके बहाल करताना सैनिकाच्या पदाचा किंवा दर्जाचा विचार केला





जात नाही. २६ जानेवारीला कधी दिल्लीला गेलास तर प्रजासत्ताक दिनाचं संचलन पाहायला चुकू नकोस. असं भव्य संचलन तू कधी पाहिलं नसशील. त्या संचलनावरून तुला आपल्या सैन्याच्या प्रतिष्ठेची आणि सैनिकांच्या शिस्तीची चांगली कल्पना येईल. सैन्यात गेल्याने समाजाशी पूर्णपणे फारकत होते, असा काही लोकांचा समज आहे. पण तो खरा नाही. कारण, आपल्या नागरी जीवनात आढळणारे अनेक व्यवसाय संरक्षण खात्यात चालू असतात. सैन्यामध्ये केवळ लढवय्ये असून भागत नाही. सैन्याला अभियांत्रिकी (इंजिनीयर), वास्तुशास्त्रज्ञ (आर्किटेक्ट), वकील, हिशेबनीस, स्वयंपाकी आणि संगीतकार यांचीसुद्धा गरज लागते.

हरीश : काका, आपल्याला खरोखरच एवढ्या मोठ्या संरक्षण दलाची गरज आहे का ? मला वाटतं, भूसेना, वायुसेना आणि नौसेना हे तीन विभाग राखणं म्हणजे फार कठीण आणि खूप खर्चाचं काम असेल, नाही का ? शिवाय, डॉक्टर किंवा शिक्षक यांची आपल्याला ज्याप्रमाणे दररोज, हरघडी गरज भासते तशी सैन्याची मदत काही दररोज भासत नाही.



शामकाका : पण हरीश, युद्ध चालू नसेल त्यावेळी सैन्य काही आराम करीत पडलेलं नसतं. युद्धासाठी सज्ज राहण्यासाठी त्यांच्याकडून सतत कवायत करून घेतली जाते. शिवाय, युद्ध चालू नसताना किंवा गरज भासेल तेव्हा सैन्य समाज-सेवाही करते. पूर, भूकंप, मोठे अपघात अशा संकटाच्या वेळी अनेकदा सैन्य मदतीचं आणि पुनर्वसनाचं काम करतं, हे तू वाचलं असशीलच. काही वेळा देशात कुठेतरी मोठ्या प्रमाणात दंगेधोपे माजतात आणि परिस्थिती पोलीसांच्या आटोक्यात येत नाही. अशा वेळीही सैन्याची मदत घेतली जाते.

सुरेश : खरंच. परवाच मी वाचलं की कुठल्याशा राज्यात दंगली माजल्या आणि सैन्याची मदत मागवावी लागली.

शामकाका : काही वेळा सैन्याखेरीज राखीव सेना दलाचीही मदत लागते.

रमेश : राखीव सेना दल म्हणजे काय ?

शामकाका : युद्धकाळात फार मोठं लढाऊ दल लागतं. लढाईत जे धारातीर्थी पतन पावतात त्यांच्या जागी राखीव लढवय्ये पाठवावे लागतात. यासाठीच राखीव सेना दल तयार ठेवतात. पण एवढे राखीव लढवय्ये जर शांतताकाळात सैन्यासारखे तयार ठेवले तर देशाला ते फारच खर्चाचं होईल. शिवाय तसं केलं तर सैन्याखेरीज इतर क्षेत्रांतील कामे करण्यासाठी मनुष्यबळाचा तुटवडा भासेल. पण आयत्या वेळी इतके लढवय्ये मिळणं हेही सोपं नाही. म्हणून नागरिकांना सैनिकी शिक्षण देण्याची खास योजना आहे. नागरिकांच्या नेहमीच्या व्यव-सायात व्यत्यय येऊ न देता हे शिक्षण दिलं जातं. असं शिक्षण घेतलेले नागरिक म्हणजेच राखीव सेना दल.

डॉ. मराठे : माझं गणवेषातलं छायाचित्र पाहिलं नाहीस का ? माझ्या अंगावर गणवेष होता याचा अर्थ मी कधी तरी सैन्यात होतो असा नव्हे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मी माझं नाव प्रादेशिक सेनेत नोंदविलं होतं.

शामकाका : याच धर्तीवर आपल्या नौसेनेसाठी राखीव भारतीय नौसेना आहे. नागरिकांना राखीव सेना दलाकडे आकर्षित करण्यासाठी त्या दलात भरती होणाऱ्यांना


'रिटेनींग फी' म्हणून अल्प भत्ता दिला जातो आणि त्या लोकांना ठराविक काळाने 'उजळणी प्रशिक्षण' घेऊन आपला दर्जा कायम राखावा लागतो. मात्र प्रत्यक्ष लढाईसाठी बोलावल्यावर त्यांना सैन्यातील सैनिकासारखे वेतन दिले जाते.

सुरेश : राखीव दलात भरती होण्यासाठी नागरिकांना काही विशेष पात्रता लागते काय?

शामकाका : युद्धाचा पुरेसा अनुभव घेऊन सैन्यातून निवृत्त झालेले लढवय्ये आणि राष्ट्रीय छात्र सेनेतून (एन. सी. सी.) किंवा सहायक छात्र सेनेतून (ए. सी. सी.) किंवा अशाच एखाद्या संघटनेतून थोडंफार प्रशिक्षण घेतलेल्यांना साहजिकच प्राधान्य देतात. पण प्रादेशिक सेनेत मात्र शारीरिक दृष्ट्या योग्य असलेल्या कोणाही व्यक्तीला भरती होता येतं. लढाई कशाशी खातात हे माहीत नसताना तुझ्या बाबांना प्रादेशिक सेनेत प्रवेश मिळाला नव्हता का? राखीव सेना दलाशिवाय आणीबाणीच्या काळात खाजगी व्यापारी जहाज कंपन्यांकडून आणि विमान कंपन्यांकडूनही प्रशिक्षित माणसांची मदत घेतली जाते.

रमेश : शारीरिक दृष्ट्या योग्य असलेल्या कोणाही व्यक्तीला जर सैन्यात भरती होता येत असेल तर मी आजच शाळेला रामराम ठोकून सैन्यात भरती होईन. मला





नेमबाजीचे प्रशिक्षण


अभ्यासाचा अगदी कंटाळा येतो. सैनिकी जीवनात किती साहस असेल नाही ?

सौ. शिंत्रे : सैन्यात जरूर जा ! पण साहसाबरोबरच धोकेही असतात हे विसरू नकोस. रणांगणावर असताना आजची सकाळ पाहिली तर संध्याकाळ पाहायला आपण असू की नाही, याची शाश्वती नसते. तुमच्या कुटुंबियांना तुमची सतत काळजी लागलेली असते. तुम्ही कुठे आहात याचा ठावठिकाणाही त्यांना माहीत नसतो. तुम्हांला त्यांना भेटता येत नाही आणि त्यांची पत्रंही तुमच्या-कडे सरळ येत नाहीत. भारत पाकिस्तान युद्धाच्या वेळी काळजीने माझा जीव सतत टांगणीला लागलेला असायचा. लष्करी अधिकाऱ्याची पत्नी होणं म्हणजे काय दिव्य असतं ते मला त्यावेळी कळलं.

शामकाका : तुमच्या मुलकी जीवनात मुळीच धोके नसतात असं म्हणायचंय का तुम्हांला ? अर्थात सीमेवर असताना आमचे जीव सतत धोक्यात असतात हे मान्य आहे मला. पण आम्हांला त्याची सवय झालेली असते.

रमेश : पण मला धोक्यांची फिकीर नाही ! सैन्यात जायची माझी महत्त्वाकांक्षाच आहे. काका, सैन्याच्या तीन दलांपैकी कोणतं सर्वात चांगलं ? भूसेना, नौसेना की वायुसेना ?


शामकाका : कोणत्याही दलात काम करणं तुला आवडेल ! प्रत्येक दलात शूर, बुद्धिमान आणि शिस्तबद्ध माणसांची गरज आहे. आताच पाहिलंस ना, भूसेनेतील एका



हवालदार गुरुदेव सिंग

साध्या हवालदाराला 'परमवीर चक्र' हे शौर्याचं सर्वोच्च सन्मानपदक कसं मिळालं? शीखांची तर जमातच मुळी शौर्याबद्दल प्रसिद्ध आहे. आता हेच चित्र पहाना. हा लान्स-हवालदार गुरुदेव सिंग. आपला जखमी हात गळ्याला बांधण्यासाठी चांगला पट्टाही त्याला मिळालेला नाही. पण तशाच स्थितीत तो शत्रूचे खंदक पार करून चालला आहे. खंदकात फट दिसली की लाथेने ती उघडून आपल्या जखमी हाताने हातबॉंब टाकतो आहे आणि त्याचवेळी उजव्या हातातील छर्र्यांची बंदूक पिस्तुलासारखी चालवितो आहे. शत्रूचा मारा चालू असताना आपल्या प्राणांची यत्किंचितही पर्वा न करता तो सतत युद्धाच्या आघाडीवर राहिला! केवढे हे शौर्य! केवढी देशभक्ती! एक हात जायबंदी झालेला असताना त्याने एकट्याने शत्रूचे अनेक खंदक पार केले. प्राणांची बाजी लावून त्याने आपल्या कर्तव्यावर अढळ निष्ठा ठेवली. त्याला गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्या पण सुदैवाने 'वीरचक्र' स्वीकारायला तो जिवंत राहू शकला. लान्स-हवालदार गुरुदेव सिंग याला आमचे शतशः प्रणाम!

हरीश : काका, हे अधिकारी कोण?







मेजर रणजित सिंग दयाळ

शामकाका : ते मेजर रणजितसिंग दयाळ. १९६५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या लढाईत त्यानी २६, २७ आणि २८ ऑगस्ट या दिवशी लागोपाठ तीन रात्री शत्रूची तीन महत्त्वाची ठाणी काबीज केली. त्यांनी काबीज केलेलं तिसरं आणि महत्त्वाचं ठाणं म्हणजे हाजीपीर खिंड ! अतिशय अवघड प्रदेशात रात्रीच्या वेळी त्यांनी आगेकूच केली. पण ठाण्यावर पोचल्यावर दयाळ मोठ्या संकटात सापडले. कारण समोरून उखळी तोफा आणि यांत्रिक बंदुकांनी सज्ज असलेली पाकिस्तानी सैन्याची तुकडी येत होती. पण आपल्यापेक्षा जास्त सुसज्ज असलेल्या शत्रूसैन्यावर तुटून पडताना या आमच्या अधिकाऱ्याला कसलीच भीती वाटली नाही. दयाळ यांच्या मागोमाग आपल्या सैनिकांच्या दोन छोट्या तुकड्या (प्लॅटून) आल्या आणि त्यांनी शत्रूला चकित करून सोडले. दयाळ यांच्या असामान्य धैर्यामुळे शत्रूने शेवटी पळ काढला. पण, दुर्दैव ! शेवटचा हल्ला चढविताना हा वीराग्रणी एका मशिनगनची गोळी लागून धारातीर्थी पतन पावला. त्याच्या शौर्याबद्दल आणि नेतृत्वाबद्दल त्याला 'महावीर चक्र' देण्यात आलं.

याच युद्धात अशाच दुसऱ्या एका शूराची गाथा लिहिली गेली. त्या






लेफ्टनंट कर्नल—ए. बी. तारापोर

शूराचं नाव लेफ्टनंट कर्नल ए. बी. तारापोर. एका रेजिमेंटचे ते प्रमुख होते आणि फिलोरा नावाच्या पाकिस्तानी ठाण्यावर हल्ला करण्याचं काम त्यांच्यावर सोपविलं होतं. शत्रूच्या माऱ्याची पर्वा न करता आपल्या जागेवर ते ठामपणे उभे राहिले. शत्रूच्या रणगाड्यांनी आणि तोफखान्याने त्यांच्यावर आणि त्यांच्या रेजिमेंटवर अग्निवर्षाव केला. तारापोर यांना जखमा झाल्या, पण ते आपल्या जागेवरून इंचभरही ढळले नाही. जखमा झाल्या असताना त्यांनी पुन्हा आपली रेजिमेंट घेऊन शत्रूवर चाल केली त्यांच्या स्फूर्तिप्रद नेतृत्वाखाली त्या रेजिमेंटने शत्रूचे जवळजवळ साठ रणगाडे नष्ट केले. आपले फक्त नऊ रणगाडे नष्ट झाले. तारापोर यांनी लढता लढता देह ठेवला. त्यांनाही मरणोत्तर 'परमवीर चक्र' बहाल करण्यात आलं.


सुरेश : ( विमानाच्या चित्राकडे पाहून ) अरे, वा ! हे तर लढाऊ विमान दिसतंय !


श्यामकाका : इथून आपल्या वायुसेनेची कथा सुरू होते. वायुसेनाही पराक्रमात मागे राहिली नाही. वैमानिकाकडे कितीही उत्कृष्ट आणि अद्ययावत उपकरणे असली तरी, स्वनातीत म्हणजे ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणारी वस्तू बरोबर टिपून खाली





पाडायची हे किती कठीण काम आहे याची सामान्य लोकांना कल्पना नसते. असं असूनही स्क्वॅड्रन लीडर कीलर याने शत्रूचे सेबर जेट विमान खाली पाडलं. त्याचा चेहरा बघितलास ? तरणाबांड पोरगा आहे! पण त्याच्या मार्गदर्शनाने चार नॅट विमाने चालविणाऱ्या पायलटांना स्फूर्ती मिळत होती. १९ सप्टेंबर १९६५ चा दिवस होता. 'चलो पाकिस्तान' या मोहिमेवर अनेक विमाने निघाली होती. त्या विमानांना लढाऊ विमानांचं संरक्षण देण्याचं काम डॅंझियल कीलरवर सोपविलं होतं. म्हणजे शत्रूच्या बॉंबवर्षावापासून त्याने आपल्या विमानांचं संरक्षण करायचं होतं. शत्रूच्या चार सेबर जेट विमानांनी कीलरच्या स्क्वॅड्रनवर ( विमानगटावर ) हल्ला केला तेव्हा भारताच्या या अँग्लो-इंडियन देशभक्ताने शर्थ केली. त्याच्या मार्गदर्शनाखाली त्याच्या हाताखालच्या पायलटांनी एक सेबर जेट पाडलं, तर त्याने स्वत: दुसरं सेबर जेट निकामी करून टाकलं. सैन्याच्या वार्ताहरांनी अशी नोंद करून ठेवली आहे की, या मोहिमेत कीलरच्या हाताखाली काम करणाऱ्या वैमानिकांनाच नव्हे, तर जमिनीवरील सैनिकांनाही कीलरपासून स्फूर्ती मिळत होती. त्याचं धैर्य आणि कर्तव्यनिष्ठा खरोखर भारतीय वायुसेनेच्या





परंपरेला साजेशी अशीच आहे. पण नौसेनेच्या बाबतीत मला अशी उदाहरणे देता येणार नाहीत. याचा अर्थ असा नव्हे की, नौसेनेतील लोक कार्यक्षम नाहीत. पण स्वातंत्र्योत्तर काळात सागरी लढाया झाल्याच नाहीत. आपली नौसेना सबंध आशियात उत्कृष्ट नौसेना समजली जाते. स्वातंत्र्यानंतर आपण आपल्या नौसेनेचा केवढा तरी विकास केलाय ! भारतीय नौसेनेचं विमानवाहू जहाज 'विक्रांत' तू कधी पाहिलं आहेस ? पाहिलं नसेल तर संधी मिळताच जरूर पाहा. नौसेनेतील नोकरीच्या अटीसुद्धा किती आकर्षक असतात ! रुबाब-दार गणवेष, भरपूर वेतन, त्याशिवाय सागरी भत्ता, भरपूर प्रवास ! साहजिकच बुद्धिमान आणि सशक्त तरुणांपैकी बहुतेकजण इतर सेनादलांपेक्षा नौसेनेत भरती होणे पसंत करतात. नौसेनेत भरती व्हायचे असेल तर तुम्हांला सागरी जीवनाची मनापासून आवड हवी आणि अनेक महिने आपल्या कुटुंबापासून आणि समाजा-पासून दूर राहण्याची तयारी असायला हवी. पण, स्वतः वायुसेनेत असल्या-मुळे मला मात्र वायुसेनेबद्दल जास्त जिव्हाळा आहे. नुकत्याच झालेल्या युद्धात आमच्या दलातील सैनिक चांगलेच चमकले. लढाई चालू असताना शत्रूच्या पॅटन रणगाड्यांच्या टप्प्यात येईल इतक्या खाली आपलं विमान आणून त्या रणगाड्याचं छायाचित्र घेणारे जवान खरोखर धन्य होत ! पाणबुड्या आणि विमानं कुठून येत आहेत हे दाखविणारं राडार यंत्र म्हणजे शत्रूच्या वायुसेनेचे जणू कान आणि डोळेच. शत्रूचं असे राडार यंत्र नष्ट करण्यासाठी त्या यंत्रावरच आपलं विमान झोकून देणाऱ्या वैमानिकांविषयी काय बोलावं ? खरोखर आत्मसमर्पणच ते !

डॉ. मराठे : यावरून मला दुसऱ्या महायुद्धातील जपानी वीरांची आठवण होते. 'टॉर्पेडो' नावाच्या पाणसुरुंगावर स्वतः स्वार होऊन हे वीर त्या पाणसुरुंगांना सरळ शत्रूच्या जहाजावर फेकीत असत. शत्रूचं जहाज निश्चित उध्वस्त होत असे,

पण त्यांचा जीव वाचण्याची किंचितही शक्यता नसायची.

सौ. शिंत्रे : पण, ते मृत्यूची शिक्षा मिळालेले गुन्हेगार होते, होय ना? त्यांना कसं तरी मरायचंच होतं. त्यामुळे फाशीने मरणं आणि असं मरणं त्यांच्या दृष्टीने सारखंच होतं.

शामकाका : खरं आहे. पण आपल्या वायुसेनेतील निष्पाप तरुण जवानांचं तसं नव्हतं. जगण्याविषयी ओढ आणि मनात काही आशाआकांक्षा बाळगलेल्या असताना ते प्राणांची बाजी लावून लढले. या असीम त्यागाला तोड नाही! एक विमान शत्रूने पकडलं होतं. वैमानिकाला त्याचं विमान शत्रूच्या विमानतळाकडे न्यायला लावलं. बंदोबस्त केलेल्या एका धावपट्टीवर त्याला उतरायला सांगि-तलं. तो उतरू लागला....एवढ्यात एकाएकी त्याने आपल्याजवळचे सर्व बाँब सरळ त्या धावपट्टीवर टाकले. त्या बाँबवर्षावाने ती धावपट्टी आणि तिथं उभी केलेली सर्व विमानं तर उध्वस्त केलीच पण त्याशिवाय, रावळपिंडी-नजीक असलेल्या शत्रूच्या सर्व विमानतळांचं जाळंच निकामी केलं. आणि सर्वात आनंदाची गोष्ट म्हणजे त्या वैमानिकाने योग्य वेळीच एक महत्त्वाचं बटण दाबून स्वतःच्या किंचित बिघडलेल्या विमानातून आणि बाँबमुळे उध्वस्त होत असलेल्या प्रदेशातून स्वतःची सुटका करून घेतली.

हरीश : खरोखर किती चित्तथरारक कहाणी आहे ही! काका, तुम्ही रोज आमच्या-कडे येऊन अशा गोष्टी सांगा. तुमच्याकडे अशा आणखी कितीतरी गोष्टींचा साठा असेल, नाही का? मला खरोखरच सैन्यात जायचंय. फक्त कुठल्या दलात जावं आणि भरती होण्यासाठी नेमकं काय करायला हवं याबद्दलच माझा थोडा गोंधळ झाला आहे.

शामकाका : तू सैन्यात जाण्यासाठी खरोखर उत्सुक आहेस हे तर मला दिसतंच आहे. पण काय रे, कधीपासून तू ही महत्त्वाकांक्षा बाळगली आहेस?

जमली. नुकत्याच पाकिस्तानशी झालेल्या युद्धापासून तर माझी सैन्यात जाण्याची इच्छा जास्तच वाढली. मला आज सैन्यात दाखल करून घेणार असतील तर मी आता दाखल व्हायला तयार आहे.

शामकाका : तुला सैनिक शाळांविषयी माहिती नाही, असं दिसतं. खरं म्हणजे तू एखाद्या सैनिक शाळेत दाखल व्हायला हवं होतं.

हरीश : सैनिक शाळा ?

शामकाका : हो. तुमची नेहमीची शाळा असते ना, तशीच. तुमच्या शाळेत सर्व विषयांचा अभ्यास घेतात किंवा वाणिज्य किंवा तांत्रिक शिक्षणावर भर देतात, तर सैनिक शाळेत सैनिकी शिक्षणावर भर देतात. तुला सध्या शाळेत शिकवल्या जाणाऱ्या सर्व विषयांचं प्राथमिक शिक्षण सैनिक शाळेत देतात. या सैनिक शाळांमधील विद्यार्थ्यांना तिथल्या छात्रनिवासामध्येच राहावं लागतं. या शाळेत उत्कृष्ट चारित्र्य, संघवृत्ती, कर्तव्यनिष्ठा, देशभक्ती आणि देशसेवा हे गुण विद्यार्थ्यांच्या अंगी बाणविले जातात. सैनिक शाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी हा इतर कोणत्याही शाळेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांच्याच दर्जाचा समजला जातो. पण पुढे जर सैनिकी पेशा स्वीकारायचा असेल त्याला राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिका ( नॅशनल डिफेन्स ॲकेडमी ) यासारख्या सर्व प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश देताना प्राधान्य दिलं जातं.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिका – खडकवासला



हरीश : मला वाटतं आपल्या शहरात अशी एकही सैनिक शाळा नाही. नाहीतर मी नक्की तशा शाळेत गेलो असतो.

शामकाका : या सैनिक शाळा अखिल भारतीय स्वरूपाच्या असतात. त्यांचा अभ्यासक्रम, निवड पद्धती आणि परीक्षाही अखिल भारतीय स्वरूपाच्या असतात. जामनगर, सातारा, भुवनेश्वर, कर्नाल इत्यादी दहा-बारा ठिकाणीच अशा शाळा आहेत. असो. तुझं शालेय शिक्षण तर जवळजवळ झालेलंच आहे. तेव्हा मला वाटतं तू आता राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेत ( नॅशनल डिफेन्स ॲकेडमी ) दाखल व्हावं. तिथं कोणत्याही सेनादलाचे अधिकारी होण्यासाठी घ्यावं लागणारं प्रशिक्षण दोन वर्षं सर्वांना सारखंच असतं. तिसऱ्या वर्षी विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार त्याला भूसेनेचं, वायुसेनेचं किंवा नौसेनेचं प्रशिक्षण दिलं जातं. त्यानंतर तुला भूसेनेत जायचं असेल तर भारतीय भूसेना प्रबोधिकेत ( इंडियन मिलिटरी ॲकेडमी ), वायुसेनेत जायचं असेल तर वायुसेना उड्डाण महाविद्यालयात ( एअर फोर्स फ्लाइंग कॉलेज ) किंवा नौसेनेत जायचं असेल तर एखाद्या नाविक प्रशिक्षण तळावर तू जाऊ शकतोस.

हरीश : राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेत जायचं असेल तर मी कोणाला भेटायला हवं ?

शामकाका : पुढच्या वर्षी तुझं शाळेतलं शेवटचं वर्ष असेल, होय ना ? त्यावेळी या प्रबोधिकांतील प्रवेशासंबंधीची जाहिरात वर्तमानपत्रात येईल. तिकडे लक्ष ठेव. मात्र त्यावेळी तुझं वय साडेसतराहून अधिक असता कामा नये. केंद्रीय लोक-सेवा आयोग ( युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन ) लेखी परीक्षांच्या तारखा जाहीर करतो. या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर मुलाखतीला बोलावतात. शालांत परीक्षा, वैद्यकीय तपासणी आणि ही मुलाखत यात यशस्वी झाल्यास प्रशि-क्षणासाठी निवड होते.

सुरेश : म्हणजे शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर निर्णय घ्यायला फारसा अवधी नाही. शालान्त परीक्षेनंतर विज्ञान किंवा वाणिज्य महाविद्यालयात गेलात आणि नंतर सैन्यात जाण्याची इच्छा झाली तर ते जमणार नाही. तुम्ही आयुष्याची चूक

करून बसलेले असाल. फारच महत्त्वाचा निर्णय आहे हा. आणि शालान्त परीक्षा उत्तीर्ण होताना तुमचं वय साडेसतरा वर्षांहून अधिक असलं तर काहीच करता येणार नाही !

डॉ. मराठे : अर्थात, वयाची साडेसतरा वर्षे होईपर्यंत जे शालन्त परीक्षा उत्तीर्ण होऊ शकत नाहीत अशा मंद बुद्धीच्या विद्यार्थ्यांना संरक्षण प्रबोधिकेत प्रवेश मिळू नये हे योग्यच नाही का ?

शामकाका : सैन्यात जाण्यासाठी अजून एक उपाय आहे. तुमचं वय साडेसतराहून अधिक असलं तरी वयाच्या सत्ताविसाव्या वर्षापर्यंत 'विद्यापीठीय प्रवेश योजने' नुसार तुम्हांला संरक्षण प्रबोधिकेत प्रवेश मिळविता येतो. या काळात तुम्ही महाविद्यालयाची द्वितीय वर्षाची (इंटर) किंवा दुसरी एखादी परीक्षा उत्तीर्ण झालेले असता. तिथून तुम्हांला लढाऊ दलात जायचं असेल तर सरळ राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेच्या तिसऱ्या वर्षात प्रवेश मिळतो. वैद्यकीय पदवी (एम. बी. बी. एस्.) किंवा तांत्रिक अभियांत्रिकी (मेकॅनिकल इंजिनियरींग) या विषयातील पदवी किंवा डिप्लोमा संपादन केला असेल तर तुम्हांला राजपत्रित श्रेणीत (कमिशन्ड रँक) घेतलं जातं आणि 'व्यापारी नौकानयन संघा'सारख्या संस्थेची अंतिम परीक्षा उत्तीर्ण झाला असाल किंवा महाविद्यालयात राष्ट्रीय छात्रसेनेचे (एन्.सी.सी.) 'क' ('सी') प्रमाणपत्र मिळविले असेल तर तुम्हांला राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेच्या तिसऱ्या वर्षात 'बहिःशाल' विद्यार्थी ('डायरेक्ट एन्ट्री' कॅडेट) म्हणून प्रवेश मिळतो.

रमेश : वर्षातून ठराविक वेळीच जर संरक्षण प्रबोधिकेत भरती केली जाते तर मग भरती केंद्रे वर्षभर का खुली ठेवतात ?

शामकाका : पुन्हा तुझा गोंधळ झालेला दिसतोय. तू शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाला असशील तर साहजिकच तुला उच्च म्हणजे राजपत्रित श्रेणीत जावं असं वाटेल. पण या अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करायला इतर माणसे हवीच. सैन्यातील पदे तीन श्रेणींमध्ये विभागलेली असतात—राजपत्रित श्रेणी (कमि-


# भारतीय भू सेनेतील श्रेणी



जनरल



लेफ्टनंट जनरल



मेजर जनरल




ब्रिगेडीयर




कर्नल




लेफ्टनंट कर्नल



मेजर



कॅप्टन



लेफ्टनंट



सेकंड लेफ्टनंट

शन्ड रँक ), कनिष्ठ राजपत्रित श्रेणी ( ज्युनियर कमिशन्ड रँक ) आणि इतर श्रेणी. कनिष्ठ राजपत्रित श्रेणी व इतर श्रेणींमध्ये भरती व्हायचं असेल तर सरळ भरती अधिकाऱ्याला भेटून भरती होता येतं. माध्यमिक शाळा सोड-ल्याचं प्रमाणपत्र असण्याचीही आवश्यकता नाही.

सुरेश : अ-राजपत्रित श्रेणीमध्ये भरती झाल्यास बढतीने किती वरपर्यंत जाता येतं?

शामकाका : काही तरी विशेष कामगिरी करून दाखविता आली तर थोडं पुढे जाता येतं, एरवी फार पुढे जाण्याची आशा नाही. सैन्यातील सर्वांत खालचं पद म्हणजे शिपाई. बढतीने तुम्ही नाईक आणि नंतर हवालदार होऊ शकता. तुम्ही चांगली कामगिरी बजावली असेल तर कनिष्ठ राजपत्रित श्रेणीत प्रवेश मिळून जमादार, सुभेदार आणि नंतर सुभेदार मेजर होता येतं. या कनिष्ठ राजपत्रित श्रेणींमधून राजपत्रित श्रेणींमध्ये प्रवेश मिळविणं मात्र फार कठीण असतं, पण तुला हा विचार करण्याचं कारण नाही. तुझं राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेतील प्रशिक्षण संपताच तू सरळ सेकण्ड लेफ्टनंट होशील. दोन वर्षांनी 'लेफ्टनंट' आणि त्यानंतर चार वर्षांनी 'कॅप्टन' होशील. नंतर तेरा वर्षांनी तू 'मेजर' होशील. अर्थात 'कॅप्टन' किंवा 'मेजर' होण्यापूर्वी परीक्षा द्याव्या लागतात. तू 'मेजर' होऊन तिथंच थांबणार नाहीस. पण पुढच्या बढत्या मात्र निवड पद्धतीने होतात आणि म्हणूनच जो जो वर जावं तो तो बढती मिळविणं फार अवघड होतं. कारण सबंध भूसेनेला अखेरीस एकच 'सेनानी' (जनरल) लागतो. 'मेजर' आणि 'सेनानी' यांच्यामध्ये 'लेफ्टनंट कर्नल', 'कर्नल', 'ब्रिगेडियर', 'मेजर-जनरल', 'लेफ्टनंट-जनरल' ही पदे असतात.

रमेश : काका, तुम्ही 'विंग कमांडर' होऊन किती दिवस झाले ?

शामकाका : एक वर्ष.

हरीश : तुम्ही वायुसेनेत कधी प्रवेश केला ?

शामकाका : अठरा वर्षांपूर्वी. पाच वर्षांचं प्रशिक्षण आणि एकूण तेरा वर्षं वायुसेनेतील सेवा झाली. मी वयाच्या एकविसाव्या वर्षी 'पायलट ऑफिसर' म्हणून सुरवात

# भारतीय वायु सेनेतील श्रेणी



एअर मार्शल




एअर व्हाइस मार्शल




एअर कमोडोर



ग्रुप कॅप्टन



विंग कमांडर



स्क्वॅड्रन लीडर



फ्लाइंग लेफ्टनंट



फ्लाइंग ऑफिसर



पायलट ऑफिसर



केली. दोन वर्षांनी ' फ्लाइंग ऑफिसर ' आणि त्यानंतर, तीन वर्षांनी ' फ्लाइंग लेफ्टनंट' म्हणून मला बढती मिळाली. नऊ वर्षांनी मी ' स्क्वॅड्रन लीडर ' झालो. हां, एक गोष्ट लक्षात ठेव. आणीबाणीच्या परिस्थितीमुळे मला अपेक्षेपेक्षा लवकर बढती मिळत गेली.

सुरेश : सबंध आयुष्य तुम्ही वायुसेनेत घालविणार का ?

शामकाका : जोपर्यंत मी शारीरिक दृष्ट्या योग्य आहे असं माझ्या वरिष्ठांना वाटल तोपर्यंत मी वायुसेनेत जरूर राहीन. शारीरिक योग्यतेच्या कसोट्या फार कठीण असतात. पण निवृत्त होण्यापूर्वी आणखी उच्च पदापर्यंत पोहचण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे.

रमेश : सर्वात उच्च पद कोणतं ?

शामकाका : 'एअर चीफ मार्शल'. पण त्यापूर्वी 'विंग कमांडर', 'ग्रुप कॅप्टन', 'एअर कमोडोर', 'एअर व्हाइस मार्शल' आणि 'एअर मार्शल' व्हायला पाहिजे. शिवाय या पदांवर पोहचण्यासाठी तुमचा आजपर्यंतचा सेवाकाल लक्षात न घेता गुणवत्ता लक्षात घेतली जाते. सुदैवानं मला बऱ्याच बढत्या मिळाल्या.

सुरेश : काका, तुम्हांला नौसेना आवडत नाही असं दिसतं ? तुम्ही नौसेनेविषयी फारच थोडे बोलता.

शामकाका : तिन्ही सेनादलांच्या पदरचनेत तसा मूलभूत फरक फारसा नसतोच. नौसेनेतही राजपत्रित श्रेणी आणि खलाशी श्रेणी असतात. नौसेनेतील सर्वोच्च पद म्हणजे ' ॲडमिरल '. नौसेना, भूसेना आणि वायुसेना यांच्या प्रमुखांमधून म्हणजेच 'ॲडमिरल', 'जनरल' आणि 'एअर चीफ मार्शल' यांच्यामधून तिन्ही सेनादलांचा सेनापती (' चीफ ऑफ दी आर्म्ड फोर्सेस ') निवडला जातो. ही निवड ज्येष्ठता, गुणवत्ता, इत्यादी गोष्टी लक्षात घेऊन केली जाते तुमचं नौसेनेचं प्रशिक्षण संपलं की तुमची ' ॲक्टिंग सब-लेफ्टनंट ' म्हणून नेमणूक होते. नंतर एक वर्षाने ' सब-लेफ्टनंट '. त्यानंतर तीन वर्षांनी ' लेफ्टनंट ', आणखी आठ वर्षांनी लेफ्टनंट कमांडर अशी बढती मिळत जाते. त्यानंतर निवड

# भारतीय नौसेनेतील श्रेणी



ॲडमिरल



व्हाइस ॲडमिरल



रिअर ॲडमिरल



कमोडोर



कॅप्टन



कमांडर



लेफ्टनंट-कमांडर



लेफ्टनंट



सब-लेफ्टनंट

पद्धतीने तुम्ही 'कमांडर' होता. त्यापुढे 'कॅप्टन', 'कमोडोर', 'रिअर ॲडमिरल', 'व्हाइस ॲडमिरल' आणि शेवटी 'ॲडमिरल' अशी श्रेणी असते. तुम्हांला सैनिकी पेशाची इतकी आवड आहे हे पाहून मला खरोखर फार आनंद झाला. अरे, पण मीच एकटा बोलतोय. तुमचं काय चाललंय ते विचारायचं राहून गेलं आणि माझी घरी जायची वेळही झाली.

तिघेही भाऊ : काका, तुम्ही किती दिवस रजेवर आहात? पुन्हा एकदा या ना आमच्याकडे.

शामकाका : मी जरूर येईन. पण आधी तुम्ही सर्वजण एखाद्या दिवशी आमच्या घरी या. येत्या शनिवारी येणार का? मग आपण सैन्याच्या काही शाखांनी भरविलेलं एक प्रदर्शन पाहायला जाऊ. आता तुम्हांला वाटत असेल की सैन्यात फक्त लढण्यासाठी माणसं लागतात. पण ते प्रदर्शन पाहिल्यावर तुम्हांला कळेल की, सैन्यात इतर प्रकारचंही बरचं काम असतं – शस्त्रास्त्रांचं उत्पादन, रस्ते आणि पूल बांधणं, इस्पितळं आणि उपहारगृहं चालविणं, इत्यादी. या सर्व कामांसाठी योग्य व पात्र माणसं लागतात.

हरीश : हो हो ! काका, येत्या शनिवारी आम्ही तुमच्याकडे नक्की येणार !

रमेश : आमच्या बरोबर आमच्या काही मित्रांना आणलं तर चालेल का ?

सुरेश : तुम्ही सैन्यात आहात, याचा आम्हांला केवढा अभिमान वाटतो. आमच्या मित्रांना तुम्हांला भेटायचंय.

शामकाका : जरूर घेऊन या तुमच्या मित्रांना.

## ‘उद्याचे नागरिक’ पुस्तकमालेतील पुष्पे

१. *चराचरांना पृथ्वी ओढी* (गुरुत्वाकर्षण)

२. *आपले पूर्वज कोण?* (उत्क्रांती)

३. *आपले सूक्ष्म शत्रू आणि मित्र* (सूक्ष्म जंतू)

४. *सामर्थ्यवान परमाणू* (परमाणूचा परिचय)

५. *विज्ञानाचे मार्गदर्शक : १*– लुई पाश्चर (जंतूशास्त्राचा जनक)

६. *लाल रंग हा रक्ताचा* (रक्ताभिसरण संस्था)

७. *आपले आशियाई बंधु : १*–इराण (इराणचा संक्षिप्त परिचय)

८. *देशाचे रखवालदार* (कर्तृत्वाच्या दिशा-भाग पहिला)

९. *चला सूर्याकडे!* (ग्रहमालेची सहल)

१०. *आपली नैसर्गिक चोंगडी* (आपली त्वचा)

११. *विज्ञानाचे मार्गदर्शक : २*–हाफकिन (माणसाची प्लेगवर स्वारी)

१२. *वरकुलात वीज* (विद्युत उपकरणे–भाग पहिला)

‘ उद्याचे नागरिक ’ ही आमची पुस्तकमाला सादर करताना आम्हांला आनंद होत आहे.

सर्वसामान्य वाचक आणि विशेषतः विद्यार्थी यांची चौकसबुद्धी जागृत करून त्यांच्या कल्पनाशक्तीला भरपूर खाद्य पुरवावे आणि ज्ञानाचे विशाल क्षेत्र त्यांना उपलब्ध करून द्यावे या हेतूने आम्ही ही योजना आखली व त्यासाठी अनेक प्रथितयश लेखक, नामवंत भाषातज्ज्ञ, उत्कृष्ट अनुवादक, त्या त्या विषयांचे जाणकार, व्यासंगी प्राध्यापक आणि अनुभवी शिक्षक यांचे सहकार्य आम्ही मिळविले.

सुरवातीला ही पुस्तकमाला विज्ञान, भूगोल व सामान्यज्ञान या विषयांपुरतीच मर्यादित राहील. ‘ मातृभाषा हेच शिक्षणाचे सर्वोत्कृष्ट माध्यम ’ या तत्त्वाचा आम्ही अंगिकार केला असून राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रयत्नात अंशतः सहभागी व्हावे या दृष्टीने आम्ही ही माला प्रथम इंग्रजी, संस्कृत, हिंदी, मराठी, गुजराती, कन्नड, तामीळ, तेलुगू, मल्याळी, व बंगाली अशा एकंदर दहा भाषांत एकाचवेळी प्रकाशित करित आहोत.

देशाच्या कानाकोपऱ्यात, सर्वसामान्य वाचकापर्यंत आणि विद्यार्थ्यापर्यंत ही पुस्तके जावीत याकरिता त्यांची किंमतही अत्यंत अल्प ठेवली आहे.

जीवन हे एक महान विद्यापीठ आहे आणि लवकरच त्यात प्रवेश करणाऱ्या बालवाचकांचे औत्सुक्य आणि कुतूहल जागृत झाले तरी आमचे हे प्रयत्न सार्थकी लागले असे आम्हांस वाटेल.

**सोमैया पब्लिकेशन्स प्रा. लिमिटेड**

